# जिल्हा माहिती कार्यालय, अहमदनगर

दूरध्वनी : ०२४१ - २४११२१२ Email : dionagar12@gmail.com Fax: ०२४१ - २४२७३७३

वृत्तपत्राचे नांव - लोकमंथन दिनांक: १८/१/२०१८


## संक्षिप्त वृत्त

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त स्पर्धा

अहमदनगर, दि.१८

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त (२५ जानेवारी) सर्व कनिष्ठ महाविद्यालयांत निबंध, घोषवाक्य व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. निबंध स्पर्धेसाठी 'मतदानात युवकांचा सहभाग', 'मतदानात महिलांचा सहभाग' व 'मतदान जागृतीबाबत माझी भूमिका' हे विषय आहेत. घोषवाक्य व पोस्टर स्पर्धाही 'मतदार जागृती अभियाना'शी संबंधीत आहेत. महाविद्यालयाने दोन निवडक निबंध, घोषवाक्य व पोस्टर स्पर्धेचे साहित्य राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील प्रा. डी. जी. शेळके यांच्याकडे २१ पर्यंत जमा करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी केले आहे. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त नगर शहरात २५ ला सकाळी ८.३० वाजता फेरी निघेल, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील माळी यांनी दिली. वाडिया पार्क येथून फेरीला प्रारंभ होईल. माळीवाडा, माणिक चौक, नेताजी सुभाष चौक, नवी पेठ, जुन्या महापालिकेमार्गे वाडिया पार्क येथे फेरीचा समारोप होईल.